# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०३.०१.२०२६

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०२/०१/२०२६ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ९०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०२/०१/२०२६ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १,८७०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. ०२/०१/२०२६ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ०३,०९,७८०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या गौण खनिज वाळुचे उत्खन्नन सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या गौण खनिज वाळुचे उत्खन्नन अंतर्गत दि.०२/०१/२०२६ रोजी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनीयम अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये पोस्टे औंढा नागनाथ येथे एकुण ०२ ठिकाणी यातील आरोपी हा त्याचे आर्थीक फायदयासाठी सदर टिप्पर मध्ये अवैध रित्या गौण खनिज वाळु उत्खनन करून वाहतुक करत चोरून विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना आम्हाला मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल एकुण ३०,२०,००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.